# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-२आय/टे-८/कांदळवन/कावि-१६९/२०२०
दिनांक : २६/०८/२०२१

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग,
कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई

**विषय :** Destruction of mangroves at Mankhurd...

**संदर्भ :** १. आपलेकडील दिनांक ०५/११/२०२० रोजीच्या पत्रासोबत श्री. प्रसाद खाले यांचा दि. २७/१०/२०२० चा तक्रार अर्ज.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगरे यांचेकडील अहवाल क्र. उविअ /पू.उ./टे-१/त.क्र.१५/कावि-५८९/२०२० दि. १०/१२/२०२०.

महोदय,

प्रस्तुत प्रकरणी आपलेकडील संदर्भ क्र. १ अन्वये श्री. प्रसाद खाले यांची कांदळवन -हासाबाबतची तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली आहे. त्यानूसार या कार्यालयाकडून कळविलेनूसार मा. उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ व दिनांक १७/०९/ २०१८ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रूपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने सदर तक्रारीबाबत उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगरे यांचेमार्फत चौकशी केली असून त्याबाबतचा विहीत नमुन्यातील अहवाल खालीप्रमाणे आहे.

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. प्रसाद खाले ई-मेल संदेश दि. २७/१०/२०२० |
| ०२ | तक्रारीचा विषय | Destruction of Mangroves at Mankhurd. |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशील<br>उदा: स.नं.., गावाचे नाव, तालुका. | मौजे मंडाळा ता. कुर्ला स.नं. ८०, न.भू.क्र. ६/१<br>मौजे - तुर्भे ता. कुर्ला स.नं. १५२, न.भू.क्र.१ |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | १.श्रीम. रश्मी कुलकर्णी, मंडळ अधिकारी, चेंबूर<br>२.श्रीम. मधुरा तारळकर, तलाठी तूर्भे<br>३. परिरक्षण भूमापक, तुर्भे<br>४. वनपाल, वनरक्षक कुर्ला, विक्रोळी<br>५. कनिष्ट अभियंता, एम/पूर्व विभाग |
| ०५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | सदर तक्रारींच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद अधिकारी व तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्रीम. श्वेता भट्ट यांनी स्थळपाहणी केली असता त्यानूसार सदर तक्रारींमध्ये नमूद जागा ही मौजे मंडाळा ता. कुर्ला येथील स.नं.८०, न.भू.क्र.६/१ व मौजे तुर्भे स.नं.१५२पै. न.भू.क्र.१ या मिळकतीमधील असून अधिसूचित वनक्षेत्राच्या जागेपैकी आहे.<br>प्रकरणी महाराष्ट्रनगर बस स्थानक ते मानखुर्द जकात नाका याठिकाणी बीपीसीएल (भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लि.) रिलायन्स (चेंबूर पाताळगंगा पाईपलाईन), एच. पी. सी. एल. व |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | गेल इंडिया लि. या एकूण ४ कंपन्यांची जमीनीखालून पाईपलाईनचे काम चालू असल्याचे समजले. तसेच सदर गॅस पाईपलाइनचे ठिकाणी कंपन्यांचे बोर्ड लावलेले दिसून आले.<br>सदर गॅस पाईपलाइनचे कामाकरिता कंपनीमार्फत कांदळवनाच्या जागेत चर खोदण्यात आलेलली असून त्यातून काढलेली माती कांदळवनालगत / कांदळवनावर टाकलेली असल्याने कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसून आले आहे. सदर जागेवर वन विभागाचा फलक लावलेला आहे. गॅस पाइपलानच्या कामासाठी योग्य त्या सर्व परवागन्या घेतलेल्या असल्याचे बी.पी.सी.एल. कंपनीचे प्रतिनिधी श्री. अक्षय चव्हाण यांनी सांगितले असून त्याबाबतची कागदपत्रे अद्यापपर्यंत तहसिलदार कुर्ला यांचे कार्यालयात सादर केलेली नाही, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांनी सादर केला आहे.<br>सदर तक्रारीत नमूद केलेली जागा ही अधिसूचित क्षेत्रापैकी असून वन विभागाच्या ताब्यातील असल्यामूळे सदर तक्रारींच्या अनुषंगाने नियमानुसार कारवाई करणेकामी विभागीय वन अधिकारी, मुंबई कांदळवन संधारण घटक यांना तसेच सदर गॅस पाइपलानच्या कामासाठी आवश्यक त्या परवानग्या घेतलेल्या आहेत किंवा कसे ? याबाबत पडताळणी करुन अहवाल सादर करणेकामी उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांना या कार्यालयाकडील दि.२६/०८/२०२१रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे. (प्रत संलग्न) |
| | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही | होय, सदर ठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास होत असल्याचे दिसून आहे आहे. सदर क्षेत्र हे अधिसूचित क्षेत्रापैकी असून वन विभागाच्या ताब्यातील असल्याने प्रकरणी कारवाई करणेकामी त्यांना कळविलेले आहे. |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबधित पोलिस ठाण्याचे नाव | निरंक |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्याक्तीचीं नावे व पत्ता | निरंक |
| ०९ | कोणत्या कायद्याअंतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | निरंक |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा, उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर यांचेकडील अहवाल व अनुषंगीक कागदपत्रे पृष्ठ क्र. ०१ ते ---- पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर केलेली आहेत.

**( निलिमा धायगुडे )**
**समन्वय अधिकारी,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**



Scanned by CamScanner

05|242

उपविभागीय अधिकारी, पूर्व उपनगर, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
निळकंठ बिझनेस पार्क, ए बिल्डींग, तळ मजला, किरोळ रोड, विद्याविहार (पश्चिम), मुंबई-४०००८६
ई मेल-sdoeasternsuburban@gmail.com दुरध्वनी क्रमांक : २५१११११२६

क्र. उविअ/पू.उ/टे-१/त.क्र.-१५/कावि-५८९/२०२०
दिनांक :- १०.१२.२०२० आ.क्र. 614

प्रति,
मा. जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत, १० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१

cms/20/21722
14/12/2020

जिल्हाधिकारी मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय
14 DEC 2020

**विषय:-** Destruction of Mangroves Mankhurd, Maharashtra nagar Bus Stop to Mankhurd Octroi Naka Bus stop.

**संदर्भ:-** १) आपलेकंडील ई-मेल दि. २८.१०.२०२०.
२) तहसिलदार कुर्ला यांचेकडील पत्र क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-६२६/२०२० दि.१०/१२.२०२०

उपरोक्त विषयांकित प्रकरणी संदर्भ क्र. २ अन्वये प्राप्त झालेल्या अहवालानुसार पुढीलप्रमाणे अहवाल सादर करीत आहोत.

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र. 3246/2004 मध्ये दिनांक 06/10/2005 रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्र. 87/2006 मध्ये दि. 27/01/2010 रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढील नमुन्यामध्ये सादर करीत आहोत.

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| 1 | तक्रारदाराचे नाव व तक्रारीचा दिनांक | श्री. प्रसाद खाले दि. 27/10/2019 |
| 2 | तक्रारीचा विषय | Destruction of Mangroves Mankhurd, Maharashtra nagar Bus Stop to Mankhurd Octroi Naka Bus stop. |
| 3 | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा- स. नं. गावाचे नाव, तालुका | मौजे- मंडाळे स.नं.80 पै. न.भू.क्र. 6/1.<br>मौजे- तुर्भे स.नं.153 पै. न.भू.क्र. 1. |
| 4 | चौकशी करण्या-या अधिका-याचे नाव व पदनाम | 1) श्रीम. रश्मी कुलकर्णी, मंडळ अधिकारी, चेंबुर.<br>2) श्रीम. मधुरा तारळकर, तलाठी तुर्भे.<br>३) परिरक्षण भूमापक, तुर्भे.<br>४) वनपाल, वनरक्षक कुर्ला, विक्रोळी.<br>५) कनिष्ठ अभियंता, एम पूर्व विभाग. |

Scanned by CamScanner
Scanned by CamScanner

# तहसिलदार कुर्ला (मुलुंड) यांचे कार्यालय

टोपीवाला कॉलेज इमारत, पहिला मजला, सरोजनी नायडू रोड, मुलुंड (प.) मुंबई 400080
फोन. :- 25602386 email- tahsildarkurlaest@gmail.com

क्र.तह/कुर्ला/जमीन/कावि-६२६/२०२० दि.१०/१२/२०२०

प्रति,
मा. उपविभागीय अधिकारी,
पूर्व उपनगर.

विषय :- Destruction of Mangroves Mankhurd, Maharashtra Nagar Bus Stop to Mankhurd Octroi Naka Bus stop

**संदर्भ :** आपलेकडील पत्र क्र.उविअ/पूउ/टे-१/कांदळवन त.क्र.१५/कावि-५००/२०२० दि.०२/११/२०२०

मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचेकडील रिट याचिका क्र.३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेल निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्र.८७/२००६ मध्ये दि.२७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंग कांदळवनाच्या ऱ्हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढील नमुन्यामध्ये सादर करीत आहोत.

| अ.क्र | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशिल |
|---|---|---|
| ०१ | तक्रारदाराचे नाव व तक्रारीचा दिनांक | श्री.प्रसाद खाले, दि.२७/१०/२०२० |
| ०२ | तक्रारीचा विषय | Destruction of Mangroves Mankhurd, Maharashtra Nagar Bus Stop to Mankhurd Octroi Naka Bus stop |
| ०३ | तक्रारीशी संबंधित जागेचा तपशिल उदा-स.नं.गावाचे नाव, तालुका | मौजे-मंडाळे- स.नं.८० पै, न.भू.क्र.६/१ व मौजे-तुर्भे- स.नं.१५२ पै, न.भू.क्र.१ |
| ०४ | चौकशी करणाऱ्या अधिका-याचे नाव व पदनाम | १) श्रीम.रश्मी कुलकर्णी, मंडळ अधिकारी, चेंबुर.<br>२) श्रीम.मधुरा तारळकर, तलाठी तुर्भे.<br>३) परिरक्षण भूमापक, तुर्भे.<br>४) वनपाल, वनरक्षक कुर्ला, विक्रोळी.<br>५) कनिष्ठ अभियंता, एम पुर्व विभाग. |
| ०५ | चौकशीमध्ये आढळुन आलेली वस्तुस्थिती | उपरोक्त तक्रारीत नमुद जागा हि मौजे-मंडाळे ता.कुर्ला येथील स.नं.८० पै, न.भू.क्र.६/१ व मौजे-तुर्भे येथील स.नं.१५२ पै, न.भू.क्र.१ मधील असुन अधिसुचित संरक्षित वन क्षेत्राच्या जागेपैकी आहे. नमुद जागेची तक्रारदार यांचे वतीने श्रीम.श्वेता भट यांचे समवेत प्रत्यक्ष संयुक्त स्थळपाहणी केली असता पुढीलप्रमाणे वस्तुस्थिती दिसुन आली आहे.<br>महाराष्ट्र नगर बस स्थानक ते मानखुर्द जकात नाका या ठिकाणी बी.पी.सी.एल (भारत पेट्रोलियम कॉर्पोरेशन लि.), रिलायन्स (चेंबूर पाताळगंगा पाईपलाईन), एच.पी.सी.एल (हिंदुस्थान पेट्रोलियम कॉर्पोरेशन |



Scanned by CamScanner

| | | |
|---|---|---|
| | | लि.) व गेल इंडीया लि. या एकुण ४ कंपन्यांची जमिनीखालुन पाईपलाईनचे काम चालु असल्याचे समजले. तसेच सदर गॅस पाईपलाईन ठिकाणी कंपन्यांचे बोर्ड लावलेले दिसुन आले. सदर गॅस पाईपलाईन कामांकरिता कंपनी मार्फत कांदळवनाच्या जागेत चर खोदण्यात आले असुन त्यातुन काढलेली माती कांदळवनालगत/ कांदळवनावर टाकलेली असल्याने कांदळवनाचा ऱ्हास झाल्याचे दिसुन आले आहे. गॅस पाईपलाईन गेलेली जागा ही काही ठिकाणी सपाट, थोडी दलदल व जागेवर काही ठिकाणी छोटी रानटी झाडे दिसुन आली. तसेच जागेवर वन विभागाचा फलक लावलेला आहे. गॅस पाईपलाईनच्या कामासाठी योग्य त्या सर्व परवानग्या घेतलेल्या असल्याचे बी.पी.सी.एल कंपनीचे प्रतिनीधी श्री.अजय चव्हाण यांनी तोंडी सांगितले असुन त्याबाबतची कागदपत्रे अद्याप कार्यालयात सादर केलेली नाही. याप्रमाणे जागेची वस्तुस्थिती आहे.<br>उपरोक्त तक्रारीत नमुद सर्व्हे नंबरची जागा ही संरक्षित वन म्हणून अधिसुचित झालेली असल्याने वन विभागाच्या अखत्यारीत आहे. त्यामुळे सदर तक्रारीचे अनुषंगाने वन विभागामार्फत योग्य ती कारवाई होणे आवश्यक आहे. |
| ०६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | होय. |
| ०७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्र. दिनांक व संबंधित पोलिस स्थानकाचे नांव | नाही. |
| ०८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्यांचेविरुध्द गुन्हा दाखल केला आहे, त्या व्यक्तींची नावे व पत्ता | नाही. |
| ०९ | कोणत्या कायद्या अंतर्गत / कलमांतर्गत गुन्हा दाखल केला त्याचे वर्णन | नाही. |

सोबत मंडळ अधिकारी यांचा अहवाल, मुळ संयुक्त स्थळपाहणी पंचनामा, जबाब यांसह प्रस्तुत प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर करण्यात येत आहे.

(संदीप थोरात)
तहसिलदार कुर्ला
(मुलुंड)

Scanned by CamScanner

- पंचनामा -

दि. २७।११।२०२०

मा. तहसिलदार साहेब ता. कुर्ला (मुलुंड) यांचेकडील पत्र क्र. तह। कुर्ला। जमिन। कांदळवन। कावि. ३९८।२०२० दि. २५।११।२०२० च्या अनुषंगाने संयुक्त स्थळपहाणी करणेसाठी १) वनपाल कुर्ला २) नगर भुमापन चेंबूर यांचेकडील परिरक्षण भुमापक तुर्भे ३) मंडळ अधिकारी चेंबूर ४) तलाठी सझा-तुर्भे ५) वनरक्षक असे सर्वजण आम्ही एकत्रित जमुन आलो.

मा. उपविभागीय अधिकारी पूर्व उपनगर यांचेकडील प्राप्त झालेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने श्री. प्रसाद खले यांचेकरीता श्रीमती. श्वेता भट या आज दि. २७।११।२०२० रोजी जागेवर उपस्थित होत्या.

तक्रारीत उल्लेख केल्याप्रमाणे मौजे - मानखुर्द महाराष्ट्र नगर बस स्थानक ते मानखुर्द जकात नाका या ठिकाणी अवैधरीत्या अनधिकृत बांधकाम करून कांदळवनाचा ऱ्हास करत असल्याबाबत तक्रार केली आहे. त्या अनुषंगाने प्रकरणी मा. उच्च न्यायालयाकडील याचिका क्र. ३२४६।२००४ रुपांतरीत जनहित याचिका क्र. ८७।२००६ मधील पारीत झालेल्या दि. ६।१०।२००५ रोजी दिलेल्या निर्णयास अनुसरुन कांदळ-वनाचा ऱ्हास करणाऱ्या व्यक्ती। संस्थेविरुध्द कारवाई करणे आवश्यक असल्यामुळे तक्रारीत जागेची तालुका स्तरीय सागर तटीय संनियंत्रण समितीमार्फत स्थळपहाणी केली असता तक्रारीत जागा मौजे - मंडाळे ता. कुर्ला येथिल सर्वे नं. ८० पैं. न. भु. क्र. ६१७ व मौजे - तुर्भे सर्वे नं. १५२ पैं न. भु. क्र. १ मधील असुन अधिसुचित संरक्षित वन क्षेत्राच्या जागेपैकी आहे.

महाराष्ट्र नगर बस स्थानक ते मानखुर्द जकात नाका या ठिकाणी बी. पी. सी. एल (भारत पेट्रोलियम कॉर्पो

Scanned by CamScanner

[illegible] (पळूर पाताळगंगा पाईपलाईन)
(हिंदुस्तान पेट्रो कार्पो लि) व गेल इंडिया लि या एकुण
४ कंपन्यांचे जमिनीखालून पाईपलाईनचे काम चालु असल्याचे
समजले तसेच सदर कंपन्यांचे ठिकठिकाणी बोर्ड लावलेले
दिसुन आले.

सदर पाईपलाईनच्या कामांकरीता कंपनी
मार्फत कांदळवनाच्या जागेत चर खोदण्यात आलेले
असून त्यातून काढलेली माती कांदळवनालगत/कांदळवनावर टाकलेली
दिसुन आली. त्यामुळे कांदळवनाचा ऱ्हास झालेला आहे.

वर लिहून दिलेली माहिती खरी असुन खोटी
आढळल्यास त्यासाठी आम्ही जबाबदार राहु याची आम्हाला
जाणिव आहे. हा पंचनामा लिहुन दिला, वाचुन पाहीला
आम्ही सांगितल्याप्रमाणे तो बरोबर आहे.

समक्ष

मं. अ. चेंबूर
27/11/2020

तलाठी सजा - तुर्भे

प.अ.
मं.अ. चेंबूर

व.र. कुर्ला
मु. कार्यालय मध्य मुंबई

उ. अधि. प्र.क्र.143
पूर्व

वनपाल कांदळवन कुर्ला

Dr. Shweta Bhatt
Conservation Action
Trust 27 Nov 2020

वनरक्षक - विक्रोळी

Scanned by CamScanner

[illegible] कार्यालय

दि. 27/11/2020

जबाब

कांदळवन सनियंत्रण गठित समिती कुळी यांचे सदस्यासमोर जबाब लिहून देणार श्रीमती श्वेता शिरुद्धार्थ भट्ट (संचालक - conservation, conservation Action Trust) -

कारणे समक्ष विचारलेवरून जबाब लिहून देते की, मे. भारत पेट्रोलियम कार्पोरेशन लिमिटेड कंपनीमार्फत पेट्रोलियम पाईपलाईन ऑप्टीकल फायबर केबल व सर्विस स्टेशन बांधकामाबाबत आमच्या संस्थेमार्फत तक्रार केल्यावरून कांदळवन सनियंत्रण गठित समितीतील सदस्यांसोबत मानखुर्द टी-जंक्शन ते वाशी पुलापर्यंत सदर कामाची स्थळपाहणी केली. सदर स्थळपाहणीमध्ये मला असे दिसून आले की, BPCL कंपनीमार्फत जे पाईपलाईनचे काम चालू आहे त्या कामामध्ये कांदळवनाचा ऱ्हास झालेला दिसून आला. सदर कांदळवनाचा ऱ्हास डेब्रीज आणि पाईपलाईनच्या कामामधील खोदलेली माती यामुळे झाला असल्याचे माझे मत आहे. सदर कामाबाबत आमच्या संस्थेमार्फत जानेवारी 2020 मध्ये महसूल विभागाकडे तक्रार दाखल केलेच्या अनुषंगाने स्थळपाहणी करण्यात आली होती. सदर स्थळपाहणीमध्ये BPCL कं.मार्फत परवानग्या सादर केली नव्हती. तसेच आजरोजीच्या स्थळपाहणीमध्ये सुद्धा BPCL कंपनीचे प्रतिनिधी श्री. अक्षय चव्हाण, सहाय्यक व्यवस्थापक उपस्थित होते. सदर कामाबाबत समिती सदस्यांनी परवानग्याबाबत विचारणा केली असता आजरोजी देखील त्यांच्याकडे कामाच्या परवानग्या व complaince Report देखील नव्हता. सदरच्या परवानग्या व complaince Report तीन ते चार दिवसात महसूल विभागाला सादर करण्याची तजवीज ठेवली आहे असे माझ्यासमक्ष सांगितले.

सदरचा जबाब हा माझ्या सांगण्यावरून मराठीत लिहीला असून व तो मला हिंदीत वाचवून दाखविला व तो मी स्वत: वाचला. सदरचा जबाब बरोबर असल्याची खात्री झाल्यावर कोणाच्याही दबावाखाली न येता, नशा व पाणी न करता स्वखुशीने त्यावर स्वाक्षरी केली आहे.

समक्ष
[signature]
पंच - चांदूर
27/11/2020

[signature] व.न. किनेकर

[signature] नवनाथ [illegible]

[signature] [illegible]

[signature] 27/11/2020 Friday

[signature] पवार [illegible] 9869924218

[signature] [illegible] - मिठबंदर

Scanned by CamScanner

# जिल्हाधिकारी मुंबई उपनगर यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१
दूरध्वनी : २६५५६७९९ फॅक्स : २६५५६८०५ ई.मेल :collectormsd@gmail.com

क्र.: सी/कार्या-२आय/टे-८/कांदळवन/कावि-१६९/२०२०
दिनांक : २६/०८/२०२१

**प्रति,**
विभागीय वन अधिकारी,
मुंबई कांदळवन संधारण घटक, कुर्ला (पू), मुंबई-२४

**विषय :** Destruction of mangroves at Mankhurd...

**संदर्भ :** १. मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांचेकडील दिनांक ०५/११/२०२० रोजीच्या पत्रासोबत श्री. प्रसाद खाले यांचा दि. २७/१०/२०२० चा तक्रार अर्ज.
२. उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगरे यांचेकडील अहवाल क्र. उविअ /पू.उ./टे-१/त.क्र.१५/कावि-५८९/२०२० दि. १०/१२/२०२०.

प्रस्तुत प्रकरणी संदर्भ क्र. १ च्या पत्रान्वये श्री. प्रसाद खाले यांची मौजे मानखुर्द ता. कुर्ला येथील महाराष्ट्रनगर बस स्थानक ते मानखुर्द नाका बस थांबा या ठिकाणी जुना वाशी पूल याठिकाणी कांदळवनाचा ऱ्हास केलेबाबत तक्रार या कार्यालयास प्राप्त झाली होती. सदर तक्रारींच्या अनुषंगाने या कार्यालयाकडून अवगत केलेनूसार स्थळपाहणी करुन उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगरे यांनी संदर्भ क्र. २ अन्वये खालीलप्रमाणे चौकशी अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. ( प्रत सामील )

सदर तक्रारींच्या अनुषंगाने उपरोक्त नमूद अधिकारी व तक्रारदार यांचे प्रतिनिधी श्रीम. श्वेता भट्ट यांनी स्थळपाहणी केली असता त्यानूसार सदर तक्रारींमध्ये नमूद जागा ही मौजे मंडाळा ता. कुर्ला येथील स.नं.८०, न.भू.क्र.६/१ व मौजे तुर्भे स.नं.१५२पै. न.भू.क्र.१ या मिळकतीमधील असून अधिसूचित वनक्षेत्राच्या जागेपैकी आहे, असा अहवाल उपविभागीय अधिकारी, मुंबई पूर्व उपनगर यांनी सादर केलेला आहे.

त्या अनुषंगाने सदर तक्रारीमध्ये नमूद क्षेत्र हे अधिसूचित कांदळवन क्षेत्रापैकी आपल्या विभागाच्या ताब्यातील असल्याने सदर तक्रारींबाबत आपले स्तरावरुन कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाही बाबतचा अहवाल मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग यांना सादर करुन त्याची प्रत या कार्यालयास पाठवावी.

( निलिमा धायगुडे )
**समन्वय अधिकारी,**
**कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समिती**
**तथा अपर जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर**

**प्रत :** मा. विभागीय आयुक्त, कोंकण विभाग, कोंकण भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई यांना माहितीस्तव.



Scanned by CamScanner